# बृहन्मुंबई महानगरपालिका

उप आयुक्त (परि.-दोन) यांचे कार्यालय

# परिपत्रक

क्र. एमडीएफ/ओडी/1938/जन, दि.18/10/2021

विषय - बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधातील ई-कोटेशन/अतारांकित निविदा प्रकरणी आढळून आलेल्या अनियमिततेबाबत कंत्राटदारांविरुद्ध करण्यात आलेल्या चौकशीच्या अनुषंगाने बजावण्यात येणा-या शिक्षादेशाबाबत.

संदर्भ - 1) **MGC/F**5666 दि.04/03/15 व दि.09/04/15.
2) **MGC/F**6684 दि.25/06/18 व दि.16/08/18.

विषयांकीत प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील CWC कामासंबंधातील ई-कोटेशन/अतारांकित निविदा प्रकरणी आढळून आलेल्या अनियमिततेबाबत मा. म.न.पा. आयुक्त यांनी दि.04.03.2015 व दि.09.04.2015 रोजी पारित केलेल्या संदर्भ क्र. 1 अन्वयेच्या आदेशान्वये, तत्कालीन उप-आयुक्त (सुधार), विद्यमान उप-आयुक्त (आ. व्य.), उप-आयुक्त (परि.-5) सध्या उप-आयुक्त (परि.-7), उप-आयुक्त (परि.-2) सध्या उप-आयुक्त (परि.-3) यांचा समावेश असलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीस चौकशी करण्याचे आदेश पारित केले होते. तसेच, म.न.पा. आयुक्तांच्या दि.26.03.2015 अन्वयेच्या आदेशान्वये संबंधित विभाग कार्यालयातील विभाग कार्यकारी अभियंता/सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत संबंधित कंत्राटदारांवर 'कारणे दाखवा नोटिस' बजावून तदनुषंगाने त्रिसदस्यीय समितीस अभिप्राय सादर करण्याचे आदेश पारित केले होते.

चौकशीअंती मा.म.न.पा. आयुक्त यांच्या संदर्भ क्र. 2 अन्वयेच्या मंजूरीनुसार खालील नमूद केलेल्या कंत्राटदारावर त्याच्यासमोरील रकान्यात नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| अनु. क्र. | कंत्राटदाराचे नाव | वेन्डर नं. | कंत्राटदारावर करण्यात आलेली कारवाई |
|---|---|---|---|
| 1. | मे. गुरुदेव ट्रेडर्स (M/S Gurudev Traders) | 15756 | M/s. Gurudev Traders वेन्डर नं. 15756 यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत नसल्याने M/s. Gurudev Traders वेन्डर नं. 15756 यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. |

**सही/-14.10.2021**

**उप आयुक्त (परि.-दोन)**